# प्रेस नोट

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुददा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | श्री. ऋषिकेश सतिश देशमुख, वय ३४ वर्ष, पद — कनिष्ठ पाणीपुरवठा व स्वच्छता अभियंता, नगर परिषद मोर्शी ता. मोर्शी जि. अमरावती. वर्ग—३ |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | १८/०३/२०२० चे १९.०६ ते १९.१३ वा. दरम्यान |
| ४ | मागणी केलेली लाच रक्कम | ३८,०००/— रुपये |
| ५ | पडताळणी दरम्यान तडजोडीअंती लाचेची मागणी केलेली लाच रक्कम | ३५,०००/— |
| ५ | स्विकारलेली लाच रक्कम | ३५,०००/— रुपये |
| ६ | घटनास्थळ | आलोसे यांचे भाडयाचे घर प्रशांत कॉलनी, मोर्शी श्री. शेषराव खाडे यांचे घरी भाडयाने ता. मोर्शी जि. अमरावती |

**थोडक्यात हकिकत** : यातील तक्रारदार हे कंत्राटदार असुन त्यांनी दि.१७/०३/२०२० रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती येथे येवुन तकार दिली होती की, त्यांनी नगर परिषद मोर्शी येथील सार्वजनिक शौचालय व मुतारी सफाईचे कामाचा ठेका घेतला आहे. लोकसेवक श्री. देशमुख हे तक्रारदार यांनी केलेल्या सफाईचे कामाचे बिल काढल्याचा मोबदला म्हणुन ३८०००/—रु. लाचेची मागणी करीत आहेत. दि.१८/०३/२०२० रोजी सदर तक्रारीच्या केलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान लोकसेवक श्री. देशमुख यांनी तक्रारदार यांना सफाईचे बिल काढल्याचा मोबदला म्हणुन ३८०००/—रु. लाचेची मागणी पंचासमक्ष करुन तडजोडीअंती ३५,०००/— रु. स्विकारण्याचे मान्य करुन सापळा कार्यवाही दरम्यान तक्रारदार यांचे कडुन पंचासमक्ष ३५,०००/— रूपये लाच रक्कम स्विकारली आहे. आरोपीस ताब्यात घेण्यात आले असुन गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती परिक्षेत्र अमरावतीचे मा.पोलीस अधिक्षक, श्री. श्रीकांत धिवरे, अप्पर पोलीस अधिक्षक श्री.पंजाबराव डोंगरदिवे व पोलीस उपअधिक्षक श्री.गजानन पडघन यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीमती रूपाली पोहनकर, पो.नि.श्री.रविंद्र जेधे, मपोहेकॉ.ज्योती झाडे पोकॉ. राजेश कोचे, शैलेश कडु तसेच चालक ए.एस.आय. श्री.सतीश किटूकले यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागातर्फे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी यानी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसमाने त्यांचे कोणतेही शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागाशी संपर्क साधावा

संपर्क :— ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती टोल फ्री क्र. — १०६४, दुरध्वनी क्रमांक ०७२१ — २५५२३५५, २५५३०५५.

(रूपाली पोहनकर)
पोलीस निरीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती

ठिकाण— मोर्शी, जि. अमरावती
दि. १८/०३/२०२०

Scanned by CamScanner